# शनिपेठ पोलीस ठाणे जळगाव जिल्हा जळगाव महाराष्ट्र

प्रेस नोट

प्रति

मा. संपादक

सर्व वृत्तपत्र व वृत्त वाहिनी

**विषय- प्रतिबंधीत नायलॉन मांजा विक्री करणाऱ्या दोन इसमांना शनिपेठ पोलीस स्टेशनने घेतले ताब्यात**

वरील विषयांवर सादर आहे की, दरवर्षी डिसेंबर व जानेवारी महीन्यात काही लोक मकर संक्रांतीचे निमित्तीने तसेच काही लोक एक छंद म्हणुन पतंग उडवतात, बऱ्याच ठिकाणी पतंगबाजी मध्ये वापरण्यात येणारा दोरा हा नायलॉन पासून बनलेला असतो त्यास नायलॉन मांजा असे म्हणतात सदर नायलॉन मांजा हा इमारतीमध्ये तसेच झाडांमध्ये अडकला जातो. सदर मांजा हा सहजासहजी तुटत नसल्याने सदर नायलॉन मांजा रस्त्याने येणारे जाणारे मोटार सायकल चालक तसेच सायकलवरुन जाणारे विद्यार्थी यांचे गळ्यात अडकुन नागरीक व विद्यार्थी जखमी होण्याचे तसेच सदर मांजामुळे जीव जाण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. तसेच सदर मांजामुळे पक्षी व प्राण्यांची जिवीत हाणी होत असुन सदर मांजा हा अविघटनशील असल्याने पर्यावरणाचा देखिल ऱ्हास होत आहे. पतंग उडवतांना नॉयलॉन मांजाचा वापरामुळे होणाऱ्या दुर्घटनांना प्रतिबंध होणेसाठी नायलॉन मांजा विक्री प्रतिबंधीत केलेली आहे.

दिनांक 07/01/2026 रोजी दुपारी 13.20 वाजेच्या सुमारास शनिपेठ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्रीमती कावेरी कमलाकर यांना मिळालेल्या माहितीनुसार शनिपेठ पोस्टे हद्दीत शनिपेठ भागातील ओक मंगलकार्यालयाचे मागे राहणारा रितांशू नरेंद्र चौधरी रा.ओक मंगल कार्यालयाचे मागे शनिपेठ जळगाव हा त्याचे राहते घराजवळ तसेच आलोक ज्ञानेश्वर भोसले रा. रिधूरवाडा जळगाव हा रिधूर वाडा येथे त्याचे राहते घरी प्रतिबंधीत नायलॉन मांजाची चोरटी विक्री करीत आहेत. अशी मिळालेल्या माहिती वरून पोनि श्रीमती कावेरी कमलाकर यांचे अधिनस्त असलेले पोउपनिरीक्षक योगेश ढिकले व इतर पोलीस स्टाफने वेळेत पोहचून सदर नायलॉन मांजा विक्रेताचा शोध घेवून छापा टाकून पकडले. त्यातील **1) रितांशू नरेंद्र चौधरी वय 19 वर्षे रा.ओकमंगलकार्यालयाचे मागे शनिपेठ जळगाव याचे ताब्यात एकूण 12,000/-रुपये किमतीचे एकूण 15 नायलॉन मांजा रिळ 2) आलोक ज्ञानेश्वर भोसले वय 20 वर्षे रा. रिधूरवाडा जळगाव यांचे ताब्यात 8000/-रुपये किमतीचे एकूण 10 नायलॉन मांजा रिळ मिळून आल्याने त्यांना ताब्यात घेतले.** पकडलेल्या दोन्ही इसमांविरुद्ध शनिपेठ पोलीस स्टेशन CCTNS NO 03/2026 व 04/2026 भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 223 पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 चे कलम 5,15 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

**जळगाव जिल्हा पोलीस दलाकडून यापुढे नायलॉन मांजा विक्री व वापर यावर प्रतिबंध करण्याकरिता मोकळ्या मैदानावर ड्रोनद्वारे नायलॉन मांजा वापर करणाऱ्या इसमांवर नजर ठेवण्यात येणार असून सदरची मोहीम अधिक तिव्र करण्यात येणार आहे. तसेच नागरिकांना देखील आव्हान करण्यात येते की, आपल्या परिसरात कोणी इसम नायलॉन मांजा विक्री किंवा वापर करत असल्यास नजिकच्या पोलीस ठाण्यास किंवा टोल फ्री क्रमांक 112 वर कॉल करून माहिती द्यावी आपले नाव गोपनीय ठेवण्यात येईल.**

सदरची कारवाई मा. पोलीस अधिक्षक सो जळगाव, अप्पर पोलीस अधिक्षक सो जळगाव परिमंडळ, तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी सो जळगाव शहर भाग यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीमती कावेरी कमलाकर यांचे नेतृत्वाखाली पो.उप.निरीक्षक योगेश ढिकले, प्रशिक्षणार्थी पोउपनिरी/संतोष खेडकर, पोहेकॉ/2834 प्रदिप नन्नावरे, पोकॉ/1349 नवजीत चौधरी, पोकॉ/467 रविंद्र तायडे यांनी केली आहे.

Dhikale

पोलीस निरिक्षक
शनिपेठ पो.स्टे.जळगांव